“संत तुकाराम आणि महात्मा जोतीबा फुले यांच्या साहित्यातील वैचारिक अनुबंध”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाची रूपरेषा

संशोधक
दत्तात्रय पुंडलिकराव जाधव
मु.पो.अवलकोंडा ता.उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक
प्रा.डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर
जि.लातूर (महाराष्ट्र)

डिसेंबर - 2020

“ संत तुकाराम आणि महात्मा जोतीबा फुले यांच्या साहित्यातील वैचारिक अनुबंध ”

अनुक्रमणिका

- प्रस्तावना
- विषय निवडीमागील भूमिका
- उद्दिष्ट्ये
- अभ्यास पद्धती
- प्रकरणांची रूपरेषा
- प्रकरण 1 ले - मराठी साहित्याचा वैचारिक व सांस्कृतिक अभ्यास
- प्रकरण 2 रे - महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण : मध्ययुगीन व आधुनिक कालखंड
- प्रकरण 3 रे - संत तुकाराम व महात्मा फुले यांचे जीवनकार्य : स्वरूप व अनुबंध
- प्रकरण 4 थे - संत तुकाराम व महात्मा फुले यांच्या साहित्याचा सांस्कृतिक अभ्यास
- प्रकरण 5 वे - संत तुकाराम व महात्मा फुले यांच्या साहित्यातील वाङ्मयीन वैशिष्ट्ये
- प्रकरण 6 वे - निष्कर्ष व समारोप
- संदर्भ ग्रंथ सूची

प्रस्तावना

मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या सर्वसामान्य लोकांच्या विचार आणि भावनांचा आविष्कार संत तुकाराम यांनी केला. तुकाराम हे नाव संतांच्या मांदियाळीत असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जसा एक अस्सल कवी आहे तसाच एक प्रखर विद्रोही विचारवंतही आहे. परंपरेने त्यांच्यातील संतत्त्वाला उचलून धरले परंतु त्यांच्यातील विचारवंताला मात्र सोयीस्करपणे दुर्लक्षित ठेवले. महाराष्ट्राचा विचार करताना संत तुकाराम यांना विचारात घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही. संत तुकाराम यांची जी प्रतिमा तयार करण्यात आली आहे, त्या पाठीमागे काय हेतू असू शकतो याचाही शोध घेणे गरजेचे आहे. कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एक लढवय्या योद्धा आहे. त्याचे नीटपणे आकलन केले पाहिजे.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा फुले यांचे योगदान आहे हे निर्विवाद सत्य आहे. त्यांनी प्रतिगामी शक्तीविरुद्ध संघटितपणे लढा उभा केला. सर्व शक्तीसाधनानिशी आपल्या हयातभर हा लढा लढला आहे. महात्मा फुले यांना भारतातील मार्टिन ल्यूथर असे म्हटले जाते. त्यांनी स्वीकारलेली वैचारिक स्पष्टता त्यांच्या सर्व अनुयायांमध्ये आहे असे ठामपणे म्हणता येत नाही. संत तुकाराम आणि महात्मा फुले या दोन व्यक्तिमत्त्वामध्ये एक सांस्कृतिक अनुबंध जाणवतो. सुमारे दोनशे वर्षे हा अनुबंध टिकला आहे. त्या अनुबंधाचा शोध घेणे हा या संशोधन कार्याचा हेतू आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संत तुकाराम यांचा कालखंड हा मध्ययुगाचा (17 व्या शतकाच्या मध्याचा इ.स.1649) कालखंड आहे. महात्मा फुले यांचा कालखंड आधुनिक युगाच्या 19 व्या शतकाच्या सुरुवातीचा कालखंड आहे. संशोधनामध्ये या दोन्ही कालखंडाचा पूर्ण विचार न करता उभय साहित्यिकांच्या समकालीन परिस्थितीचा विचार केला आहे. त्यांच्याशी

संबंधित तेवढेच घटक विचारात घेतले आहेत. तसेच त्यांच्या विचार आणि कार्यातील समान घटकांचा विचार करणे प्रस्तुत आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी चरित्रात्मक तौलनिक सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक, भाषा वैज्ञानिक, शैली वैज्ञानिक, वर्णनात्मक इत्यादी अभ्यास पद्धतींचा आवश्यकतेनुसार आधार घ्यावयाचा आहे. यासाठी प्रस्तुत उभय साहित्यिक विचारवंतांच्या साहित्यकृतींचा मूलभूत अभ्यासस्रोत म्हणून तर अन्य संदर्भ ग्रंथाचा व नियतकालिकांचा द्वितीय अभ्यासस्रोत म्हणून आधार घेतला जाणार आहे.

वर्तमानकाळात प्रस्तुत अभ्यासविषयाची आवश्यकता

एकविसावे शतक हे संगणक, इंटरनेटचे युग आहे. जागतिकीकरण, उदारीकरण या प्रस्तुत युगाच्या घोषणा आहेत. आजही आपल्या समाजात वर्ण, जाती, लिंगव्यवस्था तसेच धर्म, पंथ, वंश, भाषा, प्रदेशादी भेदभाव मानले जातात. उपरोक्त दोन्ही साहित्यिक अखिल मानवतेला आणि अखिल भारतीयत्व या मूल्यांना प्राधान्य देऊन त्यांचे साहित्य लिहितात. त्यांच्या काळात या संकल्पना उदयाला आल्या नव्हत्या तरीही त्यांच्या साहित्याचा आशय उदार, व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. अन्याय, विषमता, अनैतिकता यांना विरोध करणारा आहे. प्रस्तुत काळात या मूल्यांना खूप महत्त्व आहे. म्हणून प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

प्रकरणाची रुपरेषा

<u>**प्रकरण पहिले : मराठी साहित्याचा वैचारिक व सांस्कृतिक अभ्यास**</u>

प्रस्तुत प्रकरणात संस्कृती म्हणजे काय? याचा विचार करून साहित्याचा सांस्कृतिक अध्ययनाची सद्य:स्थिती तसेच गरज स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. सांस्कृतिक अभ्यासपद्धती ही मराठी साहित्य क्षेत्रात नवीन आहे. परिणामी या अभ्यासपद्धतीची संकल्पना, स्वरूप व दिशा तसेच मराठी साहित्याच्या सांस्कृतिक

अभ्यासात संत तुकाराम आणि महात्मा फुले यांचे स्थान याचा साररूपाने विचार करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे : महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण : मध्ययुगीन व आधुनिक कालखंड

साहित्य आणि समाज यांचा जवळचा संबंध, साहित्य आणि संस्कृती आधाराधेय, लेखक हा समाजाचा अविभाज्य घटक-समाजातूनच साहित्य व साहित्यिकांचा जन्म होतो. त्यांच्या वाट्याला आलेली सांस्कृतिक पार्श्वभूमी त्यांच्या वैचारिक जडणघडणीत निर्णायक ठरते. याचा अर्थ एका व्यक्तीघटकाचा एक साहित्यिक म्हणून विचार करत असताना त्यांच्या समकालीन जगण्याचे आडवे उभे धागे विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.

प्रस्तुत संशोधनासाठी मध्ययुगीन व आधुनिक काळातील सांस्कृतिक जडणघडणीचा सारांशाने विचार होणे गरजेचे आहे. संत तुकाराम आणि महात्मा फुले यांच्या साहित्यातील वैश्विक अनुबंध त्यातून जाणून घेणे सुलभ होते. तसा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

संत तुकाराम :

त्यांचा कालखंड त्या काळातील जीवनमूल्ये व साहित्यमूल्ये, साहित्यविषयक मानदंड, साहित्य निर्मितीचा अधिकार, राजवटी, त्यांच्यातील सत्ता संघर्ष याचा साहित्य व संस्कृतीवर होणारा परिणाम धर्म व धर्मशास्त्र यांचा समाजावर असणारा प्रभाव याचाही विचार होणार आहे.

महात्मा फुले :

त्यांचा कालखंड, त्या काळातील जीवनमूल्ये व साहित्यमूल्ये, साहित्य परंपरा 1) सनातनी 2) सुधारकी 3) ख्रिस्ती मिशनरी 4) सत्यशोधक इ. इंग्रजी राजवटीची धोरणे, आधुनिक संकल्पना मानवतावाद, फ्रेंच राज्यक्रांतीची मूल्ये, औद्योगिकीकरण, साम्राज्यवाद या सर्वांचा आवश्यकतेनुसार विचार या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : संत तुकाराम व महात्मा फुले यांचे जीवनकार्य : स्वरूप व अनुबंध

संत तुकाराम आणि महात्मा फुले यांच्या साहित्यातील जाणिवा आणि हेतू यात पुष्कळ साम्य आहे. असे असले तरी तरी कालखंडदृष्ट्या दोघांच्या काळात सुमारे दोनशे वर्षांचे अंतर आहे. प्रस्तुत प्रकरणात मध्ययुगीन आणि आधुनिक काळातील त्यांच्या वाट्याला आलेले जगणे साररूपाने अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे. दोघांचा जीवनकाळ भिन्न-भिन्न असला तरी त्यांच्या साहित्यातील प्रेरणा आणि लेखनाची धार कमालीची सारखी वाटते. याचा अर्थ ज्या सामाजिक व धार्मिक सुधारणांची गरज संत तुकाराम यांना प्रकर्षाने जाणवली. त्यात महात्मा फुले यांच्यापर्यंत फारसी प्रगती झाली नव्हती. म्हणून कालखंड भिन्न असला तरीही त्यांच्या कार्य आणि लेखनातील अनुबंध तपासण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला जाणार आहे.

प्रकरण चौथे : संत तुकाराम व महात्मा फुले यांच्या साहित्याचा सांस्कृतिक अभ्यास

प्रस्तुत प्रकरणात संत तुकाराम यांच्या पद्यसाहित्याचा आणि महात्मा फुले यांच्या गद्य-पद्य साहित्याचा लोकतत्त्वीय, सामाजिक, धार्मिक, वैचारिक व इतर अनुषंगिक अंगाने विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच लोकायत तत्त्वज्ञान, सांख्य, बौद्ध, शैव व नाथ संप्रदायाच्या संदर्भात त्यांची मते विचारात घ्यावयाची आहेत. प्रतिके, प्रतिमा, मिथके, इहनिष्ठा त्याबरोबरच विचार आणि अभिव्यक्तीतील साम्य शोधणे, त्यांचा धर्म व धर्मशास्त्रावरील मतांचा परामर्श घेणे हा या प्रकरणाचा हेतू आहे.

<u>प्रकरण पाचवे : संत तुकाराम व महात्मा फुले यांच्या साहित्यातील वाङ्मयीन वैशिष्ट्ये</u>

भाषा, लोकछंद, म्हणी, वाक्प्रचार, बोलीभाषेचा प्रभाव, परकीय शब्दांचा समर्पक वापर दोन्ही साहित्यिक विचारवंतातील साम्यस्थळांचा व इतर वैशिष्ट्यांचा विचार प्रस्तुत प्रकरणात सविस्तरपणे करावयाचा आहे.

<u>प्रकरण सहावे : निष्कर्ष व समारोप</u>

वरील प्रकरणांच्या अध्ययनातून हाती आलेले निष्कर्ष प्रस्तुत प्रकरणात सूत्ररुपाने व सारांशाने नोंदविण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

1) महात्मा फुले समग्र वाङ्मय - संपादक : धनंजय कीर, डॉ.स.ग. मालशे आणि य.दि. फडके

2) महात्मा फुले गौरव ग्रंथ - संपादक : हरी नरके

3) सार्थ तुकाराम गाथा - शासकीय प्रत

4) धर्म की धर्मापलीकडे - डॉ.आ. ह. साळुंखे

5) महात्मा फुले आणि धर्म - डॉ.आ. ह. साळुंखे

6) विद्रोही तुकाराम - डॉ.आ. ह. साळुंखे

7) विद्रोही तुकाराम समीक्षेची समीक्षा- डॉ.आ. ह. साळुंखे

8) म.जोतीराव फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये - डॉ.श्रीराम गुंदेकर

9) सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप - डॉ.श्रीराम गुंदेकर

10) तौलनिक साहित्य : सिद्धांत आणि उपयोजन-डॉ.आनंद पाटील

11) साहित्य विचार-प्रा.दि.के. बेडेकर

12) अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र - शरद पाटील

13) संतसाहित्याची सामाजिक फलश्रुती-गं.बा. सरदार

14) लोकसाहित्याची रूपरेषा-दुर्गा भागवत

15) लोकसाहित्याचे स्वरूप - प्रभाकर मांडे

16) दलित साहित्य एक क्रांतीविज्ञान- बाबुराव बागूल

17) दलित साहित्य स्वरूप आणि सिद्धांत - यशवंत मनोहर

18) निळी पहाट - रा.ग. जाधव

19) दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह - डॉ.भालचंद्र फडके

20) मराठी साहित्य आणि संस्कृती - वसंत आबाजी डहाके

21) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल.रा. नासिराबादकर

22) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - अ.ना. देशपांडे

23) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि दिशा - आनंद यादव

24) ग्रामीण साहित्य आणि वास्तव - आनंद यादव

25) साहित्याचा अवकाश - डॉ.नागनाथ कोत्तापल्ले

26) तुकाराम दर्शन - सदानंद मोरे

संशोधक विद्यार्थी

दत्तात्रय पुंडलिकराव जाधव
मु.पो.अवलकोंडा ता.उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर
मोबा.9404731010